**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

## प्रेस नोट

दिनांक 30/09/2020 (बुधवार)
(सायंकाळ)

---

### बाल्या बिनेकर खून
### प्रकरणातील फरार आरोपी जेरबंद

आज दिनांक 30/06/2020 रोजी पोस्टे बुटीबोरी येथील पोलिस स्टाफ पो. स्टे. हददीत प्रोव्हीशन व जुगार रेड कामी पेट्रोलिंग करीत असता त्यांना गोपणीय बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, मौजा रूईखैरी शिवार नॅशनल हायवे चंद्रपुर रोड वाय पॉईन्ट जवळ एक इसम अंगात काळया रंगाचा टी शर्ट व काळया रंगाचा पॅन्ट घातलेला इसम संशयित रित्या उभा आहे. अश्या खबरेवरून सदर इसमाचा शोध घेऊन विचारपुस केली असता तो उडवा उडवीचे उत्तरे देत असल्याने त्याचेवर वाजवी संशय आल्याने त्यास विश्वासात घेऊन विचारपुस केली असता त्याने आपले नाव अनिकेत यशंवत मंथापुरवार वय 24 वर्ष रा. जुनीवस्ती झिंगाबाई टाकळी मानकापुर नागपुर असे सांगुन सदर इसमास अधिक विश्वासात घेऊन विचारपुस केली असता सदर इसमाने दिनांक 28/02/2019 रोजी त्याने साथीदारासह पोलीस स्टेशन उमरेड हददीत ॲक्टीवा गाडीने जाणारा इसम फिर्यादी नामे– पुरूषोत्तम गोपीचंद रंगारी, वय 60 वर्ष, रा. बुधवारी पेठ, उमरेड यांचे अंगावर मिरची पावडर टाकुन त्याचे जवळील 99,374/– रूपये लुटले होते, तसेच दिनांक 14/10/2019 रोजी फिर्यादी नामे– निकेश महेश तोलानी, वय 29 वर्ष, रा. उमरेड हा पुजा एजेन्सीचे 8,53,000/–रू. नगदी दोन बॅगमध्ये भरून युनियन बॅंक उमरेड येथे भारण्याकरिता जात असता यातील आरोपीने आपले साथीदारासह फिर्यादीवर विटाने व चाकुने हल्ला करून जखमी करून त्याच्या जवळ असलेली पैश्याची बॅग जबरीने हिसकावुन चोरून नेले. तेंव्हापासुन सदर हा फरार होता तसेच नागपूर शहर येथील खून प्रकरणातील मृतक नामे– बाल्या बिनेकर हयास दिनांक 26/09/2020 रोजी भोले पेट्रोल पंप चौकात नागपुर येथे साथीदारासह कुऱ्हाडीने, चाकुने वार करून खुन केल्याचे सांगितले आहे. यातील आरोपीला ताब्यात घेवून पो. स्टे. सीताबर्डी नागपूर, शहर यांचे ताब्यात पुढील तपास कामी देण्यात आले.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्रीमती मोनिका राउत, उपविभागिय पोलिस अधिकारी श्री. राजेन्द्र चव्हाण नागपुर विभाग नागपुर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक श्री आशिफराजा शेख ठाणेदार पोलीस स्टेशन बुटीबोरी यांचे नेतृत्वात पोहवा मिलींद नांदुरकर, पोना सतेन्द्र रंगारी, पो.ना. राजु कापसे, पोशि राकेश तालेवार यांनी केलेली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर